# छोटा पक्षी

ख्रिस्तिआन मेरव्हेय    चित्रकार : एमा द वूट

मराठी अनुवाद : मिलिंद परांजपे



# छोटा पक्षी

खि्रस्तिआन मेरव्हेय
चित्रकार : एमा द वूट
मराठी अनुवाद : मिलिंद परांजपे



ज्योत्स्ना प्रकाशन





आज छोट्या पक्ष्याला खूप कंटाळा आला होता. लहान होता ना तो!
त्याला अजून उडता येत नव्हतं, म्हणून कुठे जाताही येत नव्हतं.

'किती दिवस हे असं नुसतं बसून राहायचं, मला तर खूप फिरायचं आहे.
बाकी सगळे कसे राहतात ते पाहायचं आहे.'



'बास झालं! उडता येत नसलं तर
उतरू झाडावरून खाली,
पण आता बाहेर पडायचंच!'

जवळच एक उंदीर उभा होता.
तो पाहतच राहिला.
झाडावरून असा खाली उतरणारा पक्षी
तो पहिल्यांदाच बघत होता!



पक्ष्यानेही उंदराकडे पाहिलं. त्याला हाक मारत विचारलं, ''ए, कोण आहेस रे तू?''
''मी? उंदीर! पण तू कोण आहेस?''
''मी छोटा पक्षी आहे. आत्ताच खाली उतरलो घरट्यातून.
मला खूप हिंडायचं आहे, जग बघायचं आहे.
पण मला सांग, तू कुठे राहतोस? आणि करतोस काय?''





''मी? मी पालापाचोळ्याखाली फिरतो, अन्न शोधतो.
जमिनीखाली छोट्या बिळात राहतो, तिथेच झोपतो.
पण माझी झोप अगदी सावध असते बरं का!''





''हो का, म्हणजे तू उंचावर राहत नाहीस तर!
पण बिळात वावरताना धडपडत असाल ना तुम्ही!
आणि जमिनीखाली राहायचं म्हणजे जरा विचित्रच....''
''अरे, सगळे उंदीर असेच राहतात. हे बघ आमचं बीळ,'' उंदीर म्हणाला.

''ठीक आहे,'' पक्षी म्हणाला.
''तुमची ही जागा खूपच लहान आहे.
तशी चांगली आहे,
पण मला काही इथे राहायला आवडणार नाही.
पुन्हा कधीतरी भेटू, पण आत्ता मी निघतो....''







“ए, तू कोण आहेस?” पक्ष्याने विचारलं.
“मी? मी बदक, आणि तू?”
“मी छोटा पक्षी आहे. नुकताच खाली उतरलोय माझ्या घरट्यातून.
मला जग बघायचं आहे आणि सगळे कसे राहतात तेही समजून घ्यायचं आहे.
पण मला सांग, तू राहतोस कुठे?”
“इतर बदकांसारखाच मी तळ्यात राहतो. पोहतो... डुबक्या घेतो....”





“अरे! अरे! मला पोहता येत नाहीये तुझ्यासारखं... मी बुडतोय...!”
बदकाने हसत हसत पक्ष्याला पाण्याबाहेर काढलं.

पक्ष्याच्या लक्षात आलं की, तो पाण्यात नाही राहू शकत.
त्याचे पंख, पिसं पोहण्यासाठी नाहीतंच मुळी.

आवडेल, सोयीचं होईल असं जीवन शोधण्यासाठी त्याला पुढे जाणं भाग होतं.





छोटा पक्षी आता दमला होता.
कंटाळलाही होता.
तो तळ्याकाठी जरा बसला.
'अगदी बुडता बुडताच वाचलो मी,
काय करावं आता?
परतावं घरट्यात, की जावं पुढे?
आणि जायचं तरी कुठे?'

इतक्यात कुंपणामागून त्याला
भुंकण्याचा आवाज आला.





पक्षी कुत्र्याकडे गेला. त्याने विचारलं, ''ए, कोण आहेस तू?''

''मी? कुत्रा, पण तू कोण आहेस?''

''मी छोटा पक्षी. नुकतंच घरटं सोडून बाहेर पडलोय मी.
मला जग बघायचं आहे, इतर सगळे जण कसे राहतात ते बघायचं आहे.
तू राहतोस कुठे? आणि काय करतोस?''

''मी बरेचदा घराबाहेरच असतो आणि मालकाच्या घराचं रक्षण करतो.
जराशी जरी चाहूल लागली तरी मी भुंकायला सुरुवात करतो.''



''भू भू!'' कुत्रा मोठ्याने भुंकला आणि
जवळून जाणाऱ्या मांजरावर झेपावला.

''मी याला इथे उभंही राहू देणार नाही. मला याचा फार राग येतो.
सगळे याचेच लाड करतात आणि मी आपला घराबाहेर!''

त्यांच्या भांडणात आणि पळापळीत बिचारा पक्षी मात्र धडपडला.
मनात म्हणाला, 'हा कुत्रा तर माझी चटणीच करणार होता!'





'मला या मांजरापासून आणि कुत्र्यापासूनही लांबच राहायला हवं!
चला! पळा, लवकर पळा!'

छोटा पक्षी धावू लागला. जोरात... जोरात... आणखी जोरात...

आणि काय आश्चर्य, त्याने अचानक आकाशात भरारी घेतली....







छोटा असला तरी पक्षी तो पक्षीच,
आणि पक्षी म्हणजे उडणारच!
उडणं हेच त्याचं जीवन!





ज्योत्स्ना प्रकाशन
www.jyotsnaprakashan.com
9 788179 252673
₹ ५०/-